## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

### (सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


# अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१८/३६ दिनांक: ५ फेब्रुवारी २०१८

## अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी आरक्षण सोडत

विद्यापीठ जाहिर सूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१८/स/२६२९, दिनांक ४ फेब्रुवारी २०१८ ला जोडून या अधिसूचनेद्वारे सर्व संबंधितांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४) मध्ये सुधारणेबाबत शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १/२०१८, पत्र क्रमांक अध्यादेश २०१७/प्र.क्र.४५८/विशि–३, विद्यापीठ निदेश क्रमांक १/२०१८ आणि अधिनियमातील **कलम ३०(४)(च) (छ) व (झ) नुसार** अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी सोमवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न झालेल्या सभेत पुढीलप्रमाणे चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | विवरण | आरक्षित प्रवर्ग व आरक्षित जागेची संख्या |
|---|---|---|
| १. | अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्यामधून अधिसभेने आळीपाळीने निवडून द्यावयाचा एक प्राचार्य. | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती – १ |
| २. | अधिसभेचे सदस्य असतील अशा, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक यामधून अधिसभेने आळीपाळीने निवडून द्यावयाचा एक अध्यापक. | इतर मागासवर्ग – १ |
| ३. | अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून अधिसभेने आळीपाळीने निवडून द्यावयाचा एक नोंदणीकृत पदवीधर. | अनुसूचित जमाती – १ |

तसेच यासंदर्भात सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ज) नुसार अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेने निवडून द्यावयाच्या दोन प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी आळीपाळीने अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाचा आहे. परंतु, विद्यापीठ अधिसभेकरिता व्यवस्थापन प्रतिनिधींच्या निर्वाचकगणात राखीव प्रवगांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील एकमेव राखीव जागा निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार सदर राखीव जागेवर अनुसूचित जाती प्रवर्गातील सदस्य अधिसभेवर उपलब्ध असल्याने, अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर राखीव प्रवगांतर्गत निवडून द्यावयाच्या व्यवस्थापन प्रतिनिधींचा प्रारंभिक आरक्षण बिंदू विद्यापीठ निदेश क्रमांक १/२०१८ मधील अनुच्छेद ५ नुसार **अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता निश्चित करण्यात आला आहे.** त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्ग वगळून इतर प्रवर्गाकरिता चिठ्ठया टाकून सोडतीने आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणीचे सर्व सदस्य.
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य.
३. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.
५. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.)
(अति. कार्यभार)